# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 184/2023 दिनांक : 09.05.2023

## 1)सदोष मनूष्य वध :—

**कंधार :—**दिनांक 08.05.2023 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **माधव गोविंद साकळे यांचे घरासमोर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुरेश केशव साकळे, वय 29 वर्षे, रा. सीतानगर कंधार ता. कंधार जि. नांदेड,** यातील फिर्यादीबाई व शेजारील बाई यांचेत लेकराचे कपडे घालण्याचे कारणारून वाद चालु झाल्याने यांतील फिर्यादी व तिचा नवरा व इतर गल्लीतील लोक सोडवण्यात गेले असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीचा नवऱ्याच्या मानेत हात घालुन दगडाचे भिंतीवर ढकलुन दिल्याने तो बेशुध्द पडला त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना कंधार येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मयत घोषीत केले. यातील मयताचे मरणास आरोपी हा कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी नंदाबाई सुरेश साकळे, वय 23 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सीतानगर कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 132/2023 कलम 304, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री अदित्य लोणीकर, मो.नं. 9422336474** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**1)वजिराबाद :—**दिनांक 08.05.2023 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **आंध्रा समीती हायस्कुलच्या पाठीमागे इलेक्ट्रीक डेपोजवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादी गुरूद्वारा येथील डयुटी संपवुन कोर्टाच्या पाठीमागुन हिंगोलीगेटकडे जाणारे रोडने घरी जात असतांना अंदाजे सायंकाळी साडे सहा वाजताचे सुमारास आंध्रा समीती हायस्कुलच्या पाठीमागे इलेक्ट्रीक डेपोजवळ एक बुटका इसम जाड शरिरयष्टीचा निळया चौकडीचा शर्ट, जिन्स पँट घातलेला अंधारात हात करून मदत मागीतल्याने फिर्यादीने त्यास गाडीवर बसवुन घेतले त्याने गाडीवर पाठीमागे बसल्यावर फिर्यादीस गाडी चालवु द्या असे म्हणाला व गाडीची चावी मागु लागला असता फिर्यादीने त्यास नाही म्हणाले असता त्यावर त्याने खाली उतरून गालावर, छातीवर, कपाळावर, डोळयाच्या भुवईवर हाताने बुक्की मारून खाली पाडुन पँटच्या खिशातील नगदी 5,000/—रूपये व शर्टच्या वरील खिशातील रिअलमी कंपणीचा मोबाईल किंमती 8,000/—रूपयाचा असा एकुण 13,000/—रूपयचा मुद्येमाल जबरीने चोरून घेवुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी नारायण जगसिंघ कामठेकर, वय 48 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. जी. एस. पिंकी ट्रान्सपोर्ट नंदीग्राम नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 150/2023 कलम 394 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मुत्येपोड, मो.क्रं. 9146579102** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 06.05.2023 रोजी 18.00 ते दि. 08.05.2023 रोजी 06.27 वा. चे दरम्यान, **एम्पायर फार्मा होलसेल मेडीकल दुकान रावल कॉम्पलेक्स वजिराबाद नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादीने आपले एम्पायर फार्मा होलसेल दुकान बंद करून घरी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करून दुकानातील गल्यातील 1,06,600/—रूपये चोरून नेले. वगैरे **फिर्यादी महम्मद शाबाद पि. महम्मद सादीक, 31 वर्षे, व्यवसाय एम्पायर फार्मा होलसेल मेडीकल रा. एचआजी कॉलनी आयटीआय कॉलेज जवळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 151/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री केंद्रे, मो.क्रं. 9850827563** हे करीत आहेत.

**2)माहुर :—** दिनांक 05.05.2023 रोजी 10.30 ते दि. 06.05.2023 रोजी चे 08.30 वा. चे दरम्यान, **प्रॉपर माहुर वार्ड क्रमांक 01 हॉस्टेलच्या पाठीमागे राहाते घरी माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे कुटूंबासह देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले व तसेच त्यांच्या कॉलनीतील शेजारील जीवन बळीराम अग्रवाल हे पण कुटूंबा सोबत देवदर्शनासाठी बाहेरगावी गेलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे व शेजारील घराचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटाचे लॉक तोडुन आत ठेवलेले सोन्या—चांदीचे दागीने व नगदी रूपये असा एकुण 2,92,200/—रूपये व कागदपत्राची बॅग चोरून नेले. वगैरे **फिर्यादी प्रफुल्ल विकास राठोड, वय 38 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. वार्ड क्रमांक 1 रूद्र हॉटेलच्या मागे माहुर ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरन 55/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पवार, मो.क्रं. 9823290456** हे करीत आहेत.

## 3)अर्धापुर :— 
दिनांक 06.05.2023 रोजी 24.00 ते दि. 07.05.2023 रोजी चे 08.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी आंबेडकर नगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे आई वडील औरंगाबाद येथे कामासाठी गेले असता कोणीतरी आज्ञात आरोपीने घराचे समोरील गेटचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून हॉलमधील ठेवलेले कपाटाचे हॅंडल तोडुन आत मधील नगदी 20,000/—रूपये सोन्याचे दागीने असा एकुण 36,000/—रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी त्रिरत्न दिलीप सरोदे, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आंबेडकर नगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 153/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**2081 शेख, मो.क्रं. 9923400081** हे करीत आहेत.

# 4)मो.सा. चोरी :—

## 1)विमानतळ :—
दिनांक 06.05.2023 रोजी 18.00 ते 20.15 वा. चे दरम्यान, **नॉक आऊट आरीना नावाचे स्पोर्ट क्लब आर. के. फंक्शन हॉल नुरी चौक जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच—26/एक्स—6882 किंमती 50,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी उबेदुर रहमान पि. हफीजुर रहेमान, वय 35 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. मस्तानपुरा नवीन मोंढा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 161/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांचाळ, मो.क्रं. 9423437844** हे करीत आहेत.

# 5)विवाहीतेचा छळ :—

## शिवाजीनगर :—
दिनांक 05.05.2012 ते दि. 08.05.2023 चे 06.00 वा. चे दरम्यान, **राधाकृष्ण नगरी विजयनगर जवळ नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस माहेरहुन धंदा टाकण्यासाठी एक ते दीड लाख रूपये घेवुन येण्यासाठी शारिरीक व माणसीक त्रास देवुन छळ केला. पैसे न आणल्यामुळे तीचे चारीत्र्यावर संशय घेवुन फिर्यादीस जमीनीवर पाडुन लोखंडी हातोडयाने फिर्यादीचे तळपायावर मार दिला. तसेच डोक्याला उजवे पायाला मारल्याने टाके पडले आहेत. व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 140/2023 कलम 498(अ), 324, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री घुगे, मो.क्रं. 9284848994** हे करीत आहेत.

# 6)जुगार :—

## 1)विमानतळ :—
दिनांक 08.05.2023 रोजी 18.45 वा. चे सुमारास, **हनुमानगड कमानीचे समोर महाराणा प्रताप सोसायटी मधील टीनपत्राचे दुकानात नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार व कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5,500/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2305, सदाशिव माणिकराव आवाड, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 162/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांचाळ, मो.क्रं. 9423437844** हे करीत आहेत.

## 2)नांदेड ग्रामीण :—
दिनांक 08.05.2023 रोजी चे 14.20 वा. चे सुमारास, **आमदुराकडे जाणारे रोडच्या बाजुस वडगाव कॉर्नर जवळ मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार ओपन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1450/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री माधव नामदेव केंद्रे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 322/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंग, मो.क्रं. 9823333377** हे करीत आहेत.

# 7)प्रोव्हिबीशन :—

## 1)भाग्यनगर :—
दिनांक 08.05.2023 रोजी चे 13.15 वा. चे सुमारास, **पोस्टे भाग्यनगर हद्दीत नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2100/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/516 हनवता पि. सोपानराव कदम, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 177/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1133 बोरकर, मो.नं. 9112389670** हे करीत आहेत.

## 2)मरखेल :—
दिनांक 08.05.2023 रोजी चे 20.20 वा. चे सुमारास, **मौ. हाणेगाव बसस्थानक जवळ इंडियन हॉटेलच्या बाजुला रोडवर मौ. हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटटीची गावठी दारू किंमती 1500/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2864 नारायण पांडुरंग यगांले, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 106/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 बारी, मो.नं. 9552514590** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

दिनांक-09.05.2023

# प्रेस नोट

**नांदेड जिल्हयातील मोबाईल मिसींग मधील 15,18,500 /- रूपयाचे 110 अँड्रॉईड मोबाईल हस्तगत सायबर पोस्टेची कार्यवाही :-**

नांदेड जिल्हयातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता मा. पोलीस अधिक्षक नांदेड यांनी पो.स्टे. सायबर पोउपनि जी.बी.दळवी यांना आदेशीत केले होते.त्यानूसार सायबर सेलचे एक पथक व नांदेड जिल्हयातील सर्व उपविभागाचे पथक तयार करून मिसिंग मोबाईलचा शोध घेणेची मोहीम राबविण्यात आली होती.

नांदेड येथील उपविभागातील पथकाने व स्थागुशाच्या पथकाने सायबर सेलचे तांत्रीक सहकार्याने जिल्हयातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळया ठिकाणी जावून नांदेड जिल्यातील एकूण 110 मोबाईल किंमत 15,18,500/- रूपयाचे हस्तगत केले आहेत. त्यांचे आज एकत्रितरीत्या मा.पोलीस अधिक्षक साहेब यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा.पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक श्री अबिनाश कुमार,नांदेड डॉ.श्री खंडेराय धरणे, भोकर. गृह पोलीस उपअधिक्षक श्रीमती डॉ.अश्विनी जगताप,पो.नि.ड्जिी.चिखलीकर स्था.गु.शा. सपोनि.शिवाजी लष्करे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे सायबर पोउपनि जी.बी.दळवी, सोपान थोरवे, पोलीस अमंलदार सुरेश वाघमारे, राजेन्द्र सिटीकर, दिपक ओढणे, रेशमा पठाण,दाविद पिडगे, काशिनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, सायबर सेलचे सर्व अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

सदर कामगीरी बाबात मा. पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सर्व पथकाचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क पोलीस अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड

Scanned with CamScanner



दि. 09/05/2023

# प्रेसनोट

## गांजा विक्री करणाऱ्या दोन आरोपीसह 2 किलो .386 ग्रॅम गांजासह अटक

## स्थानिक गुन्हे शाखा, नांदेडची कामगिरी

नांदेड शहरात व जिल्हयात अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक श्री श्रीकृष्ण कोकाटे यांनी पोलीस निरीक्षक, श्री व्दारकादास चिखलीकर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक, स्थागुशा, नांदेड यांनी अंमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणाऱ्यांची माहिती काढून आरोपीस अटक करण्यासाठी पथके तयार करुन सूचना दिल्या होत्या.

दिनांक 08/05/2023 रोजी गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, गाडेगाव रोड पाण्याची टाकी जवळ दोन इसम त्यांचे ताब्यातील बुलेटवर NDPS ॲक्ट च्या तंरतुदी चा भंग करुन अंमली पदार्थ गांजाच्या लहान लहान पुडया करुन लोकांना विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती.

सदर माहिती मिळालेल्या गाडेगाव रोड पाण्याचे टाकीजवळ दोन इसम 1. फेरोज खान मेहबुबखान ऊर्फ बेग वय 31 वर्षे व्यवसाय बेकार रा. टायरबोर्ड नांदेड. 2. प्रमोद दिलीप सोनकांबळे वय 27 वर्षे व्यवसाय बेकार रा. लिंबोनीनगर नांदेड हे एका बुलेटवर पांढ-या पोत्यात गांज्याचे पॉकीट भरुन विक्री करीत असताना मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून अंमली पदार्थ गांजाची लहान- लहान प्लास्टीक कॅरीबॅगचे 231 पॉकेट अंमली पदार्थ गांजाचे एकुण पांढऱ्या पोत्यासह वजन 02.496 किलो ग्रॅम व निवळ लहान- लहान प्लास्टीक कॅरीबॅग पॉकेट एकुण वजत 02.386 वजनाचे किंमती प्रति किलो 20,000/- रुपये प्रमाणे एकूण 47,720/- व एक काळया रंगाची बुलेट जिचा RTO पार्सीग नंबर एम.एच.26/ सी.बी./8713 असी जुनी वापरती किंमत अंदाजे 1,00,000/- **असा एकूण 1,47,720/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे**. आरोपी 1. फेरोज खान मेहबुबखान ऊर्फ बेग वय 31 वर्षे व्यवसाय बेकार रा. टायरबोर्ड नांदेड. 2. प्रमोद दिलीप सोनकांबळे वय 27 वर्षे व्यवसाय बेकार रा. लिंबोनीनगर नांदेड यांना सदरचा गांजा कोठून आणला याबाबत विचारपुस केली असता सदरचे गांजाचे पॉकीट आरोपी नामे 3. जोहराबी ऊर्फ बब्बा खाला भ्र. अन्नवर खान पठाण रा.टायरबोर्ड नांदेड हिने तयार करुन विक्री करण्यासाठी दिल्याचे निष्पन्न झालेले आहे. म्हणून वरील तीन्हीही आरोपींविरुध्द कलम 20 (b) II,(b),22 एन.डी.पी.एस. ॲक्ट 1985 प्रमाणे कायदेशिर पो.स्टे. नांदेड ग्रामीण येथे फिर्याद देण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.स्टे. नांदेड ग्रामीण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, नादेड, मा.श्री अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, मा.श्री खंडेराव धरणे, अपर पोलीस अधीक्षक, भोकर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री व्दारकादास चिखलीकर, पोलीस निरीक्षक, स्थागुशा, नांदेड, सपोनि पांडूरंग माने, पोउपनि दत्तात्रय काळे, पोहेकॉ/ गंगाधर कदम, पोहेकॉ/अफजल पठाण, पोकॉ/विलास कदम, पोकॉ/मोतीराम पवार, पोकॉ/ रणधीर राजबन्सी, चापोहेकॉ/शंकर केंद्रे व चापोकॉ/ हनुमानसिंह ठाकूर, पोकॉ/ बिचकुले अंगुली मुद्रा यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे मा.पोलीस अधीक्षक यांनी कौतुक केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

CS Scanned with CamScanner